अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# शिखर बँक पोखरून काढणारी भ्रष्टचाराची वाळवी

जेव्हा एखादा महापूर येतो त्यावेळेला त्याच्याबरोबर झाडे झुडपे किंवा लाकडे–ओंडकेही वहात येतात. त्या महापुरामुळे नदीच्या परिसरातील अनेक गोष्टींचे नकळत किंवा आपोआप नुकसान होऊन जाते. सध्या दोन्ही काँग्रेस पक्षांची अशीच परिस्थिती झाली आहे. दारुण पराभवानंतर आता या दोन्ही पक्षांनी जे काही पूर्वकर्म करून ठेवले आहे तेदेखील हळूहळू बाहेर येतील. आणि त्याचे त्यांना उत्तर द्यावे लागेल आणि वेळ पडली तर जबाबदारी स्वीकारावी लागेल. महाराष्ट्रात शिखर बँक मानल्या जाणाऱ्या राज्य सहकारी बँकेचे काँग्रेसच्या नेत्यांनी जसे समजून उमजून बारा वाजवले आहेत. आणि त्यात घड्याळ चिन्ह असलेल्या राष्ट्रवादीचेच नेते कसे जास्त संख्येने आहेत हे सहकार आयुक्तांनीच उघड केल्याने खळबळ उडणे स्वाभाविक ठरते. दीड दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत कोट्यवधींचा आर्थिक घोटाळा झाला. त्याम ध्ये अनेक राजकीय नेत्यांनी या बँकेला डब्यात घालण्याचे काम केले. त्यासंदर्भामध्ये सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समि ती नेमली होती. आणि आता त्याचा अहवाल बाहेर आला तो सादर करण्यासाठीदेखील बराच वेळकाढूपणा केला गेला.

परंतु या अहवालामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांसह जवळपास पन्नास राजकीय नेत्यांवर ठपका ठेवला गेला आहे. आपापल्या मर्जीतल्या साखर कारखान्यांना, सूतगिरण्यांना नियम धाब्यावर बसवून कर्जे दिली गेली. आणि त्यातला धक्कादायक भाग असा की, ही घेतलेली कर्जे नियमाप्रमाणे परत करण्याची मूल्यदेखील या लोकांनी पाळली नाहीत उलट मंत्रीमंडळातील आपापल्या पदाचा गैरवापर करून बँकेवर दबाव आणला गेला आपल्या मर्जीतल्या लोकांना कर्जे देण्याच्या दाबून दडपून शिफारशी केल्या गेल्या आणि शेवटी या बँकेला अक्षरश: डबघाईचे दिवस आले. राज्यभरातल्या सगळ्याच सहकारी संस्थांचा खरे तर आर्थिक आधार असलेल्या या शिखर बँकेचा कणा मोडण्याचे काम अनेक कणाहीन राजकारण्यांनी केलेले स्पष्ट होते. सहकार आयुक्तांनी घोटाळ्याची चौकशी केली आहे. त्यात ज्यांनी बँकेची तिजोरी नियमबाह्य पध्दतीने लुटण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर ठपका ठेवला आहे. अर्थात असे अनेक अहवाल सादर होतात. ठपके ढुपके किंवा आरोप ठेवले जातात. परंतु प्रत्यक्षात पुढे कोणतीच कारवाई होत नाही. त्यामुळे आता नुसता ठपका ठेवून काम भागणार नाही तर यापुढे असे घोटाळे करण्याची हिंमत होणार नाही. असा धक्का या राजकीय नेत्यांना दिला गेला पाहिजे.

## अजित पवार सर्वाधिक वादग्रस्त

महाराष्ट्रात आपण सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलो आहोत अशा थाटामध्ये वावरणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवारांना लोकसभा निवडणुकीत जबरदस्त धक्का बसला, त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हायचे आहे पण राज्यातून चार खासदार निवडून आणता आले नाहीत खरे तर अजित पवारांकडे राष्ट्रवादीची धुरा गेल्यापासून या पक्षाच्या मागे शुक्लकाष्ठ लागल्यासारखी परिस्थिती पहायला मिळते. गेल्या पाच वर्षांमध्ये तर महाराष्ट्राचा सर्वाधिक वादग्रस्त नेता म्हणून अजित पवारांनीच मान मिळवला. सिंचन घोटाळ्याबाबत थेट महालेखापालांनी असाच ठपका ठेवून नियमबाह्य कंत्राटे दिली गेल्याचे म्हटले होते. त्यासंदर्भातही अजित पवारांना राजीनामा द्यावा लागला होता. राज्यातील शेकडो एकर जमीन भ्रष्टाचारामुळे ओलिताखाली येऊ शकली नाही, आणि या भ्रष्टाचाराने शेतकऱ्यांच्या शेतातले पाणी पळवले.

अनेक शहरांना आणि गावांना पिण्याचे पाणीही मिळू शकलेले नाही पश्चिम महाराष्ट्रातल्या अनेक भागात दुष्काळाचे थैमान सुरू झाले. घोटाळे आणि भ्रष्टाचाराने राज्याच्या विकासाला या मंडळींनी कायमचे ग्रहण लावले. शेतकऱ्यांपासून ते सामान्य माणसापर्यंत कोणालाही त्याने सोडलेले दिसत नाही. आपल्याला मिळालेल्या सत्तेचा फक्त स्वत:साठी कसा वापर त्यांनी केला. भ्रष्टाचारामध्ये दोन्ही काँग्रेसच्या नेत्यांनी दाखवलेला सहकार अपूर्णच म्हणायला हवा. परंतु त्यांच्या या स्वार्थीपणामुळे राज्यातल्या सहकार चळवळीचा स्वाहाकार झाला. हे सहकार आयुक्तांच्या या ताज्या अहवालावरून पुराव्यानिशी सिध्द होते.

## विकासाचे राजकारण हवे

सहकार आयुक्तांच्या अहवालात भाजपाच्या दोन चार नेत्यांची नावे आहेत. त्यामुळे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस किंवा विरोधी पक्षनेते विनोद तावडे यांनी अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी करण्यापूर्वी आपल्या पक्षात असलेल्या काही कर्तबगार नेत्यांचाही त्यांनी विचार करावा. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर बाहेर आलेल्या या सहकार घोटाळ्याच्या अहवालाने दोन्ही काँग्रेस आणखीनच अडचणीत सापडू शकतात. बँक तर बुडवली. आता आपल्याबरोबर निवडणुकीमध्ये हे नेते पक्षालाही बुडवतील. अशी एकूण चिन्हे दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीतील पराभवाच्या महापुराबरोबरच आता अशा या भ्रष्टचाराच्या गैरकारभाराच्या कथा बाहेर आल्या आहेत. आणि ते नुकसानही या दोन्ही पक्षांना सहन करावे लागेल.

एकेकाळी संपूर्ण देशात अग्रेसर असलेल्या सहकारचळवळीला राजकारणाची वाळवी लागली आणि त्यांनी चांगल्या मोठमोठ्या संस्थादेखील पोखरून काढल्या त्यात राज्याची शिखर बँकही सुटली नाही. सहकार आयुक्तांच्या या अहवालाचे निमित्त घेऊन केवळ शिखर बँकच नव्हे तर एकूण सहकार चळवळीचे शुध्दीकरण करायला हवे. आणि या चळवळीची प्रतिष्ठा पुनरुज्जीवीत करायला हवी. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपा या अहवालाचा राजकीय वापर करेलच. परंतु तो करताना समजा युतीची सत्ता येणार असेल तर हा सहकार वाचवण्यासाठी त्यांच्याकडे काय उपाययोजना आहेत. हेदेखील सांगावे लागेल. कारण आता नुसत्या राजकीय आरोपांनी काम भागणार नाही विकासाचे राजकारण करावे लागेल तरच लोकांचाही विश्वास बसेल.